# * जम्मू आणि काश्मीर विशेष दर्जा *

⇒ कलम १ - ज व का भारतीय संघराज्याचे घटकराज्य - त्याचे क्षेत्र भारताचे क्षेत्र.
⇒ भाग २१ मधील ३७० कलम - ज व का ला विशेष राज्याचा दर्जा.
⇒ भारतीय राज्य घटनेतील सर्व तरतुदी त्याला लागू होत नाही.
⇒ स्वतः ची वेगळी राज्यघटना असलेले एकमेव राज्य.

## * जम्मू आणि काश्मिरचे भारतात विलिनीकरण *

* जम्मू आणि काश्मीर ⟶ १५ ऑ. १९४७ रोजी स्वतंत्र. — महाराज हरिसिंग याने भारत किंवा पाक मध्ये सामील न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय)
* २० ऑक्टो १९४७ ⇒ पाक सैन्याच्या चिथावणीने आझाद काश्मीर सैन्याने राज्यांच्या सीमांवर आक्रमण - त्यावेळी भारतात सामील होण्याचा निर्णय.
* २६ ऑक्टो १९४७ ⇒ पतप्रधान नेहरु व हरिसिंग - यांच्यात विलिनीकरणाचा करार - यानुसार संरक्षण, परराष्ट्रव्यवहार व संचार हे विषय भारताकडे.
  ⇒ राज्यातील जनता राज्यघटना ठरविलेपर्यंत भारतीय घटनेद्वारे व्यवस्थापन.
  → त्यामी नुसार भारतीय घटनेत कलम ३७० चा समावेश. त्यामध्ये जम्मू आणि काश्मीर संबंधीच्या तरतुदी अस्थायी स्वरूपाच्या.

१७ नोव्हें १९५२ पासून हे कलम लागू :

तरतुदी ⇒ १) कलम २३८ मधील राज्याच्या प्रशासनासंबंधीच्या तरतुदी ज व का ला लागू नाही.
२) राज्यासाठी कायदे करण्याचा संसदेचा अधिकार.
(I) केंद्रसूची व समवर्ती सूचीतील विषय राष्ट्रपती राज्य सरकारशी विचार-विनिमय करुन घोषित करतील.
(II) कलम १ मधील आणि कलम ३७० मधील तरतुदी लागू होतील.
(III) कलम ३७० लागू होत नाही किंवा काही अपवाद व बदल करुन लागू होते असे राष्ट्रपती घोषित करु शकतो मात्र राज्याच्या संविधान सभेच्या शिफारशी नुसारच.

भारत व जम्मू आणि काश्मीर संबंध :

१९५० ⇒ कलम ३७० च्या तरतुदीनुसार संघराज्याचे राज्यावरील अधिकारक्षेत्र निश्चित करण्यासाठी जम्मू व काश्मीरला लागू करणारा आदेश राष्ट्रपतीने जारी केला.

१९५४ ⇒ जम्मू आणि काश्मीरच्या विधानसभेने विलीनीकरणास व दिल्लीशी करारास मान्यता.

Scanned by CamScanner

१९५४ → राष्ट्रपतीने घटना आदेश लागू - त्याने संघराज्याचे राज्यावरील अधिकारक्षेत्र व्यापक करण्यात आले.

सध्याची परिस्थिती :

① ज व का. एक घटकराज्य, - घटनेच्या भाग १ व परिशिष्ट १ चा भाग. परंतु विधिमंडळाच्या (राज्याच्या) संमतीशिवाय त्यांच्या नावात, सीमांत, किंवा क्षेत्रात बदल करता येत नाही.

② राज्याला स्वत:ची राज्यघटना, राज्यघटनेनुसार प्रशासन. राज्यघटनेचा भाग ६ राज्याला लागू होत नाही. या भागातील राज्य संज्ञेत ज व का-चा समावेश नाही.

③ केंद्रसूचीतील बहुतेक विषयावर व समवर्ती सूचीत नमूद केलेल्या बऱ्याचशा विषयावर संसद राज्याशी संबंधित कायदे करू शकते - दहशतवादी कारवाया, सार्वभौमत्व, क्षेत्रीय अखंडतेस आव्हान; राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राज्यघटना यांचा अवमान अशा बाबी वगळता उर्वरित अधिकार राज्य विधिमंडळाला.

④ प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेबाबत संसदेने केलेले कायदे राज्याला लागू नाही.

⑤ मालमत्तेच्या मूलभूत हक्काची हमी आहे.

⑥ सार्व. नोकऱ्या, मालमत्ता अधिग्रहण, वसन व सरकारी शिष्यवृत्त्या - हे विशेष अधिकार फक्त राज्याच्या स्थायी निवासी लोकांना.

⑦ भाग ४ व ४ए राज्याला लागू नाही.

⑧ राज्य सरकारच्या संमतीशिवाय अंतर्गत अशांततेमुळे घोषित करण्यात आलेली राष्ट्रीय आणीबाणी राज्याला लागू होत नाही.

⑨ या राज्याबाबत आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार नाही.

⑩ राज्याची घटना निलंबित ठेवण्याचा राष्ट्रपतीला अधिकार नाही.

⑪ राष्ट्रपती राजवट राज्याला लागू आहे परंतु भारतीय घटनेप्रमाणे नाही तर राज्याच्या घटनेप्रमाणे सरकार काम करीत नसेल तर. - (राज्यपालांचे शासन)
राज्यात दोन प्रकारची आणीबाणी - ① भारतीय राज्यघटनेनुसार - राष्ट्रपती शासन
१९८६ मध्ये प्रथमत राष्ट्रपती राजवट ② राज्याच्या —— " —— राज्यपाल शासन.

⑫ कोणत्याही क्षेत्राच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय करार किंवा तह राज्य विधिमंडळाच्या संमतीनेच.

⑬ राष्ट्रपतींच्या आदेशाने लागू केलेल्याशिवाय भारतीय राज्यघटनेतील दुरुस्ती लागू होत नाही.

⑭ SC/ST च्या संदर्भातील परिशिष्ट ५ व ६ राज्याला लागू नाही.

⑮ सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अवकाश अधिकारक्षेत्र, निवडणूक आयोग आणि महालेखापरिक्षक यांचे अधिकारक्षेत्र राज्याला लागू होते.

⑯ ज व का चे उच्च न्याया. फक्त मूलभूत अधिकारासंबंधी आदेश जारी करू शकते. इतर कारणासाठी नाही.

⑰ पाक मध्ये स्थलांतरीत झालेले ज व का चे स्थायी निवासी पुन्हा स्थायिक होण्यासाठी परत आल्यास त्यांना पाक मधून स्थलांतरीत म्हणून नागरिकत्व कायद्याचा भाग 2 लागू होत नाही. त्यांना भारताचे नागरिकत्व मिळते.

Scanned by CamScanner

यावरून · ① इतर राज्यांपेक्षा राज्याला खूपच अधिक स्वायत्तता व अधिकार आहेत.
② इतर राज्यांपेक्षा केंद्राचे राज्यातील अधिकारक्षेत्र खूपच सिमीत आहेत.

*** जम्मू आणि काश्मीर राज्यघटनेची वैशिष्ट्ये ***

सप्टें/ऑक्टो १९५१ - राज्याच्या जनतेने प्रौढ मताधिकाराच्या तत्वावर संविधान सभा -

३१ ऑक्टो १९५१ - पहिली बैठक - काम पूर्ण होण्यासाठी ५ वर्षांचा कालावधी.

१७ नोव्हें १९५६ - राज्यघटना स्वीकृत

२६ जाने १९५७ - पासून लागू.

वैशिष्ट्ये - ① ज. व का. भारताचा एकात्मिक भाग आहे असे घोषित करण्यात आले.
② जनतेला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची हमी.
③ अगोदरच्या राजाच्या अंमलाखालील सर्व क्षेत्र - POK सहीत.
④ खालील स्थितीत भारताचा नागरिक राज्याचा स्थायी रहिवाशी समजला जाईल.
→ जर १४ मे १९५४ रोजी * तो श्रेणी १ किंवा श्रेणी २ चा प्रजाजन असेल. किंवा
→ त्याने कायदेशीर मार्गाने राज्यात स्थावर मालमत्ता मिळविली असेल व त्या तारखेपूर्वी १० वर्षे राज्यात वास्तव्य करीत असेल. किंवा
→ १४ मे १९५४ रोजी श्रेणी १ किंवा श्रेणी २ चा प्रजाजन आणि १ मार्च १९४७ नंतर पाक - मध्ये स्थलांतरित झाला असेल आणि स्थायिक होण्यासाठी राज्यात परत आला असेल.
⑤ राज्याच्या स्थायी रहिवाशांना भारतीय राज्यघटनेत हमी दिलेले सर्व अधिकार असतील परंतु स्थायी या संज्ञेमध्ये केवळ राज्यविधिमंडळच बदल करू शकते.
⑥ राज्यघटनेत राज्यव्यवस्थेसाठी - मार्गदर्शक तत्वांची सूची - परंतु न्यायालयाद्वारे अमलात येणार नाही.
⑦ द्विगृही विधिमंडळाची तरतुद: विधानसभा = १११ सदस्य - (POK - २४ जागा - रिक्त)
विधानपरिषद = ३६ सदस्य
⑧ राज्यपाल विधिमंडळाचा एकात्मिक भाग आहे - राज्यपाल भूमिका इतर राज्यांप्रमाणे.
⑨ मूळ राज्यघटनेत (१९५७) राज्याचा प्रमुख व सरकारचा प्रमुख यांची नावे अनुक्रमे (राष्ट्रपती) ⇒ सदर-ए-रियासत व वजीर ए आझम (पंतप्रधान)
१९६५ मध्ये राज्यपाल व मुख्यमंत्री संबोधण्यात आले.
⑩ उच्च न्यायालय - न्यायाधिशांची नियुक्ती - राष्ट्रपती - प्रारंभिक / अपिलीय / आदेश
⑪ राज्यपाल राजवटीची तरतुद ⇒ राज्यपाल राष्ट्रपतीच्या सहमतीने राज्य सरकारचे सर्व अधिकार स्वतः कडे घेऊ शकतो. तो विधानसभा विसर्जित करू शकतो व मंत्रिमंडळ पदच्युत करू शकतो.
(कारण राज्याच्या घटनेप्रमाणे कारभार सुरू नसेल)

Scanned by CamScanner

सन १९७७ मध्ये पहिल्यांदा राज्यपालांची राजवट.
यापूर्वी १९६४ मध्ये कलम ३५६ने राष्ट्रपती राजवट लागू.

(२) राज्याची अधिकृत भाषा - उर्दू - विधिमंडळाने इतर निर्णय घेईपर्यंत इंग्रजी वापरास मान्यता.

(३) राज्याच्या घटनेत घटनादुरुस्तीची प्रक्रिया → प्रत्येक गृहाने त्या त्या गृहातील एकूण सदस्य संख्येच्या 2/3 बहुमताने विधेयक संमत करून → मात्र विधेयक फक्त विधानसभेत. भारतीय संघराज्य संविधान बदल करणारे कोणतेही विधेयक दोन्ही गृहात मांडता येत नाही.

*※ २६ जून २००० - जम्मू आणि काश्मीर स्वायत्तता देण्याचा ठराव नामंजूर ※*

राज्यात आवाजी मतदानाने मंजूर परंतु केंद्राकडून नामंजूर.

वैशिष्ट्ये :
① कलम ३७० मधील अस्थायी शब्द प्रयोगा ऐवजी विशेष शब्द प्रयोग करावा.
② केंद्राकडे फक्त संरक्षण, परराष्ट्र व संचार हे विषय असावेत.
③ कलम ३५६ लागू करू नये (राज्य जम्मू व काश्मीर ला)
④ केंद्रिय निवडणूक आयोगाला राज्याच्या संदर्भात भूमिका नसावी.
⑤ अखिल भारतीय सेवा नसाव्यात.
⑥ सदर-ए-रियासत व वजीर ए आझम ही नावे असावीत.
⑦ मुलभूत हक्कांची वेगळी सनद असावी.
⑧ संसद व राष्ट्रपती यांच्या भूमिकेत घट केली जावी.
⑨ SC/ST व मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी असू नयेत.
⑩ आंतरराज्यीय नद्या व नदी खोरे याबाबत निवाडा करण्याचा केंद्राचा अधिकार काढून घ्यावा.

*※ जम्मू आणि काश्मीरसाठी मध्यस्थांचा गट ※*

ऑक्टो २०१० ⇒ प्रख्यात पत्रकार दिलीप पाडगावकर यांच्या अध्यक्षतेखाली.
एम.एम. अन्सारी व राधा कुमार हे इतर सदस्य.
राज्याच्या समस्यांबद्दल राजकीय उपाययोजनांची रूपरेषा ठरविण्याचे काम.
अहवाल ऑक्टो २०११ ⇒ 'अ न्यू कॉम्पॅक्ट विथ द पीपल ऑफ जम्मू ॲण्ड काश्मीर' शीर्षक
१९५२च्या दिल्ली कराराचा आढावा घेण्यासाठी घटनात्मक समिती स्थापन करावी - शिफारस.

इतर शिफारशी :
① अस्थायी शब्द काढावा. विशेष हा शब्द वापरावा.
② राज्यपाल राजवटीच्या काळात ३ महिन्यात निवडणुका घ्याव्यात.
③ अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांचे प्रमाण कमी करून राज्य नागरी सेवेतील अधिकाऱ्यांचे प्रमाण हळूहळू वाढवावे.
④ गव्हर्नर व चिफ मिनिस्टर नावे चालू रहावीत - उर्दूमध्ये उर्दू शब्द वापरावे.
⑤ जम्मू, काश्मीर व लडाख यांची तीन क्षेत्रीय परिषदा स्थापन कराव्यात.
⑥ पंचायती राज व्यवस्था बळकट करावी.

## जम्मु काश्मीरची राज्यघटना :

एकूण परिशिष्टये : ०७ - ०१ = ०६

परिशिष्ट १ - सद्र ए रियासत पदाची निवडणूक पद्धती (वगळले)

२ - राज्यपाल संबंधी - वेतन / भत्ते / विशेषाधिकार.

३ - विधानसभा / विधानपरिषद अध्यक्ष / उपाध्यक्ष वेतन व भत्ते.

४ - उच्च न्यायालय न्यायाधिश वेतन व भत्ते.

५ - प्रतिज्ञा / वचननाम्याचे प्रारूप

६ - क्षेत्रीय भाषा

७ - पक्षांतराच्या कारणावरून अपात्रता.

### काही महत्वाची कलमे:

कलम: ३ - राज्याचे भारतीय संघराज्याशी संबंध.

कलम ४ - राज्याचे क्षेत्र

कलम ६ - कायमस्वरूपी निवासी.

कलम ११ ते २५ - राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे.

कलम २६ ते ३४ - राज्यपाल संदर्भात.

कलम ३५ ते ४५ - मंत्रि आणि महाधिवक्ता.

कलम ४६ ते ९२ - राज्यविधीमंडळ

४८ - पाक व्याप्त क्षेत्रासाठी तरतुदी, ७९ - वार्षिक वित्तिय पत्रक . ७६ व ७७ - अर्थविधेयक

कलम ९३ ते १०८ - उच्च न्यायालय.

कलम १०९ ते ११३ - दुय्यम —

कलम ११४ ते १२३ - वित्त, मालमत्ता, व करार. - १२४ ते १३७ - सार्वजनिक सेवा

कलम १२८ ते १३० - राज्य लोकसेवा आयोग

कलम १३८ ते १४२ - निवडणुका

कलम १४४ व १४५ - राज्याचा ध्वज व राज्याची भाषा.

कलम १४७ - घटनादुरूस्ती

कलम १५८ - अन्वयार्थ